# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०२.०३.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०१/०३/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २६८ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,३४,९५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. ०१/०३/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रूपए असा एकुण ६,२१०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि. ०१/०३/२०२३ रोजी पोस्टे हटटा येथे ०१ इसमाविरूध्द कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**अवैध रेती/गौण खनिज वाहतुक करणाऱ्या विरूध्द गुन्हा नोंद :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध रेती वाहतुक करणाऱ्या विरूध्द दिनांक ०१/०३/२०२३ रोजी पोस्टे हटटा येथे ०१ ठिकाणी कलम ३७९,३४, भादवी व सहकलम ४८(७)(८) सह कलम ४८ गौन ख.अधी अन्वये गुन्हा दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**गुटखा बंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. ०१/०३/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ३२८,२७२,२७३,१८८ भादवी सह कलम २६(२)(प),२६(२)(पअ),२७(२)(म),३०(२)(अ),५९ अन्नसुरक्षा व मानके अधि अन्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले असुन यातील नमुद आरोपीने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला गुटखा व मानवी जिवीतास धोका असलेले पान मसाले विक्री करण्याच्या उददेशाने स्वताचे ताब्यात बाळगतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास हिंगोली शहर पोलीस करित आहेत.